SHRI GULABRAO ESHWARA KHANDVE EDUCATIONAL FOUNDATION,

# JAGADGURU INTERNATIONAL SCHOOL, LOHEGAON, PUNE

**TERM 1 EXAM (2024-25)**

**Class: IX** **Section: A** **Subject: Marathi ( 009 )**

**Date: 20/ 09/2024** **Total Marks: 80**

**Roll No. : ____** **Time: 3 Hours**

**General Instructions :**

i) **The Question Paper consists of Two sections- Reading and Comprehension Literature based questions and Grammar**

ii) **All questions are compulsory.**

iii) **Read the question carefully before attempting it.**

---

## विभाग अ . गुण ४०

**प्रश्न १अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ( कोणतेही ५)** **गुण -५**

सुधा मूर्तींनी संगणक शास्त्रज्ञ व अभियंता म्हणून आपल्या करिअरची सुरुवात केली. टेल्को कंपनीत निवड झालेल्या त्या पहिल्या महिला अभियंत्या होत्या. टाटा कंपन्यांसाठी त्यांनी पुणे, मुंबई आणि जमशेदपूर येथे काम केले आहे.शिवाय, पुण्याच्या ख्राईस्ट कॉलेजात त्या प्राध्यापक होत्या. बंगलोर विद्यापीठात त्या अभ्यागत प्राध्यापिका आहेत. इन्फोसिस या संस्थेच्या कार्यात त्यांचा विशेष सहभाग आहे. या संस्थेच्या विश्वस्त म्हणूनही त्या काम पाहतात. महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील लोकांनाही संस्थेने मदत दिलेली आहे. सूधा मूर्ती यांच्या सामाजिक कार्यात आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, सार्वजनिक स्वच्छता, कला आणि संस्कृती आणि तळागाळातील गरिबी निर्मूलन यांचा समावेश आहे. त्यांनी स्थापन केलेली इन्फोसिस फाऊंडेशन ही 1996 मध्ये स्थापन झालेली कंपनी सामाजिक कार्य करते त्यामुळे ती धर्मादाय संस्था आहे आणि सुधा मूर्ती तेथील विश्वस्तांपैकी एक आहेत.या फाऊंडेशनच्या माध्यमातून त्यांनी पूरग्रस्त भागात 2,300 घरे बांधली आहेत.तमिळनाडू आणि अंदमानमधील त्सुनामी, कच्छ, गुजरातमधील भूकंप, ओरिसा, आंध्र प्रदेशमधील चक्रीवादळ आणि पूर आणि कर्नाटक आणि महाराष्ट्रातील दुष्काळ यासारख्या राष्ट्रीय नैसर्गिक आपत्तींना हाताळले आहे.

i ) सुधा मूर्ती या पुण्याच्या कोणत्या कॉलेजात प्राध्यापक होत्या ?
ii ) सुधा मूर्ती यांनी आपल्या करिअरची सुरुवात कशी केली ?
iii ) टाटा कंपन्यांसाठी त्यांनी कोठे -कोठे काम केले आहे?
iv ) इन्फोसिस फाऊंडेशनची स्थापना कधी झाली ?
v ) फाऊंडेशनच्या माध्यमातून सुधा मूर्ती त्यांनी पूरग्रस्त भागात किती घरे बांधली ?
vi ) " हाताळने " या शब्दाचा अर्थ लिहा .
vii) सुधा मूर्ती यांच्या कोणत्याही २ सामाजिक कार्याविषयी माहिती लिहा .

**ब ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** **( कोणतेही ५ )** **गुण -५**

| |
|---|
| स्वामी विवेकानंद (नरेंद्रनाथ दत्त) हे एक भारतीय संन्यासी आणि तत्त्वज्ञ होते. त्यांचा जन्म १२ जानेवारी, १८६३ कोलकाता येथे झाला . जुलै, १९०२ बेलूर मठ, बंगाल प्रेसिडेन्सीयेथे त्यांचे निधन झाले . स्वामी विवेकानंद हे रामकृष्ण परमहंस यांचे प्रमुख शिष्य होते. ते पाश्चात्य गूढवादाने प्रभावित झाले आणि त्यांनी पाश्चात्य जगाला वेदांत आणि योगाच्या भारतीय दर्शनांचा (शिकवण, पद्धती) परिचय करून दिला. त्यांनी भारतातील हिंदू सुधारणा चळवळींमध्ये प्रमुख भूमिका निभावली. त्यांनी ब्रिटिश शासित भारतात राष्ट्रवाद आणण्यात योगदान दिले. विवेकानंदांनी रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशन स्थापना केली. श्री रामकृष्ण यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी विवेकानंदांनी हिंदू तत्त्वज्ञान आणि अध्यात्माचा सखोल अभ्यास केला. आपल्या गुरूच्या निधनानंतर, ते एक भटके भिक्षू बनले आणि देशाच्या सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती समजून घेण्यासाठी जगभर प्रवास केला.जगभर प्रवास करताना 1893 मध्ये, स्वामी विवेकानंद यांनी शिकागो येथील जागतिक धर्म संसदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व केले. "अमेरिकेच्या बहिणी आणि बंधू" या शब्दांनी सुरू झालेल्या त्यांच्या प्रसिद्ध भाषणाने भारतीय अध्यात्म आणि तत्त्वज्ञानाचा पाश्चात्य जगाला परिचय करून दिला आणि त्यांना आंतरराष्ट्रीय व्यक्तिमत्त्व बनवले. |

i ) स्वामी विवेकानंद यांनी पाश्चात्य जगाला कशाचा परिचय करून दिला ?
( वेदांत आणि योगाच्या भारतीय दर्शनांचा / स्वातंत्र्याचे / अध्यातत्मिकतेचे )
ii ) श्री रामकृष्ण यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी विवेकानंदांनी कशाचा सखोल अभ्यास केला ?
( हिंदूसंस्कृतीचा / पौराणिक संस्कृतीचा / हिंदू तत्त्वज्ञान आणि अध्यात्माचा )
iii ) 1893 मध्ये, स्वामी विवेकानंद यांनी कुठे हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व केले?
( इंग्लंड / शिकागो / कोलकाता )
iv ) स्वामी विवेकानंद यांचा जन्म कधी व कोठे झाला ?
v ) स्वामी विवेकानंद हे कोणाचे प्रमुख शिष्य होते ?
vi ) विवेकानंदांनी कशाची स्थापना केली ?

## व्याकरण -गुण २०

**प्रश्न २. अ ) सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही ४)** गुण ४

i) मधु हुशार आहे—------ अभ्यास करत नाही. ( पण / परंतु - योग्य उभयान्वयी अव्यय निवडून वाक्य पूर्ण करा. )
ii) शाळेच्या आजूबाजूस गर्द झाडी होती. ( वाक्यातील विशेषण ओळखून लिहा)
iii) मोराच्या डोक्यावर तुरा आहे. ( वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखून लिहा)
iv) शाबास! असेच यश तुला मिळत राहो. ( वाक्याचा प्रकार ओळखा)
v) सुमन गटागटा औषध पिते. ( वाक्यातील क्रियाविशेषण अव्यय ओळखा)

**ब) सूचनेप्रमाणे वाक्य बदलून लिहा. ( कोणतेही ४)** गुण ४

i) हे सगळेच आपले मित्र आहेत. ( वाक्याचा भूतकाळ करा)
ii) ताई आज दिल्लीवरून येईल. ( वाक्याचा वर्तमान काळ करा )
iii) विजेचे बिल पाठवले होते. ( वाक्याचा भविष्यकाळ करा )
iv) मी क्रिकेटची मॅच पाहिन. ( वाक्याचा भूतकाळ करा )
v) नाटक सकाळी पाच वाजता संपले. ( वाक्याचा भविष्यकाळ करा)

**क) खालील वाक्य सूचनेप्रमाणे बदल करून लिहा. ( कोणतेही ४)** गुण ४

i) आत पाय ठेवायला जागा नव्हती. ( प्रश्नार्थी वाक्य बनवा )
ii) तू आमच्याकडे येशील?.( विधानार्थी वाक्य बनवा )
iii) माणूस अमर होतो. ( प्रश्नार्थी वाक्य बनवा )
iv) विक्रम साराभाई खूप बुद्धिमान होते. ( उद्गारार्थी वाक्य बनवा )
v) पोलिसांना सहकार्य करा. ( नकारार्थी वाक्य बनवा )

**प्रश्न ३. अ ) समानार्थी शब्द लिहा. ( कोणतेही २)** गुण २

i) अभिवादन- ii) कर्दम- iii) नवल-

**ब) विरुद्धार्थी शब्द लिहा. ( कोणतेही २)** गुण २

i) सोय x ii) श्रेष्ठ x iii) टाकाऊ x

**क) लिंग बदला. ( कोणतेही २)** गुण २

i) म्हातारी- ii) सुभेदारीन- iii) निर्मिती-

**ड) वचन बदला . ( कोणतेही २)** गुण २

i ) शाल - ii ) नोटा - iii ) दोऱ्या

**<u>प्रश्न ४. अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ( कोणतेही ५ )</u>** गुण -५

एडिसनने आव्हान स्वीकारले खरे; पण हे काम वाटते तितके सोपे नव्हते. कृत्रिमरीत्या प्रकाश निर्माण करण्याचे व रात्रीचे दिवसात रूपांतर करण्याचे यापूर्वीही काही प्रयत्न झाले. सर हंफ्रे डेव्ही याने खाणीमध्ये वापरण्यासाठी एक कमानदार दिवा तयार केला होता. त्यात वीज वाहून नेणाऱ्या तारांच्या टोकांना कार्बनचे म्हणजे कोळशाच्या पदार्थाचे तुकडे जोडलेले होते. तारांची कार्बन जोडलेली टोके जवळ आणली, की त्यातून झगझगीत प्रकाश निर्माण व्हायचा; पण या प्रकाशाच्या उपयोगाला फार मर्यादा होत्या. दर वेळी कार्बनचे तुकडे जाळून प्रकाश निर्माण करणे हे काम खर्चीक होते. त्यातून निर्माण होणारा विषारी वायू हाही धोकादायक होता. प्रकाश तर जास्त वेळ टिकणारा हवा. तो कमी खर्चात निर्माण करता यायला हवा. तो फार प्रखरही नको. त्यातून विषारी वायूचा धोकाही नको. हे सारे कसे जमायचे? एडिसनचे विचारचक्र सुरू झाले.

कोणताही नवा शोध एकाएकी लागत नाही. निरीक्षण, अनुमान, प्रयोग, पुन्हा पुन्हा प्रयोग करणे हे चक्र सतत चालूच असते. एडिसनने प्लेटिनमचा उपयोग करून पाहिला. तो थोडा फार यशस्वी झाला; पण असला महागडा प्रयोग व्यवहार्य नव्हता. उन्हाळ्याचे दिवस. हातातल्या पंख्याने वारा घेत असताना एडिसनचे लक्ष पंख्याच्या काडीकडे गेले. ''या बांबूपासून कार्बन करता येईल का?'' मनात विचार आला, की लगेच प्रयोगांना सुरुवात. हा बांबू कोणत्या जातीचा असावा? उष्ण कटिबंधात आणि विशेषत: आफ्रिका आणि आशिया खंडात बांबूच्या असंख्या जातींची लागवड केली जाते.

i ) खाणीमध्ये वापरण्यासाठी दिवा तयार केला त्यांचे नाव –
( एडिसन /सर हंफ्रे डेव्ही / सर प्लूटो )
ii ) -------- कटीबंधात आणि विशेषतः आफ्रिका आणि आशिया खंडात बांबूच्या असंख्य जातीची लागवड केली जाते .
( थंड / उष्ण / दमट )
iii ) यापूर्वीही कोणत्या प्रकारचे प्रयत्न झाले होते ?
iv ) कोणते काम खर्चिक होते ?
v ) बांबूपासून कार्बन तयार करता येऊ शकतो , असा विचार एडिसनच्या मनात केव्हा आला ?
vi ) कोणत्याही गोष्टीचा शोध लगेच लागत नाही त्यासाठी कोणते चक्र चालू असते ?
vii ) कोणत्या प्रकारच्या प्रकाशाला मर्यादा होत्या ?

ब ) खालील कविता वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ( कोणतेही ५ ) गुण -५

व्यायाम आरोग्यदायी मित्र । हे ध्यानी ठेवावे सूत्र ।
आळस वैरी मानिला सर्वत्र । सर्वतोपरी ।।

व्यायामाविण सात्त्विक भोजन । तेहि मारी विकारी होऊन ।
व्यायामे होय अग्निदीपन । अन्नपचन सहजचि ।।

व्यायामे जडत्व जाई दूरी । व्यायामे अंगी राहे तरतरी ।
रक्तव्यवस्था उत्तम शरीरी । वाढे विचारी सजीवपण ।।

व्यायामाने सशक्त स्नायु । व्यायामे मानव होय दीर्घायु ।
व्यायामहीना पित्त, कफ, वायु । जर्जर करिती अत्यंत ।।

व्यायामे वाढे प्रतिकार शक्ति । स्वावलंबनाची प्रवृत्ति ।
व्यायामे अंगी वाढे स्फूर्ति । कार्य करण्याची ।।

i ) सात्विक भोजनाबरोबर आपण नियमित काय केला पाहिजे **?**
ii ) व्यायामुळे शरीरातील काय व्यवस्थित होते **?**
iii ) व्यायामामुळे माणसाला काय प्राप्त होते **?**
iv ) विरोध करण्याची शक्ती असलेली **-**
v ) स्वतःची कामे स्वतः करणारा **-**
vi ) आरोग्य देणारी **-**

## विभाग ब .- गुण ४०
## साहित्य-गद्य

**प्रश्न ५अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा . ( कोणतेही ३ )** गुण ३
i) लेखकावर सखु आजीच्या मृत्यूचा काय परिणाम झाला ते लिहा?
ii) एडिसनने कोणते आव्हान स्वीकारले ?
iii) प्रवाशांची घाट उतरणीची सुख सोय नी सरबराई पाहण्याचे कंत्राट घेणारे कोण?
iv) अगतिक होऊन शिरीष कोणाला विनंती करत होता?

**ब) रिकाम्या जागा भरा. ( कोणतेही ३** ) गुण ३
i) ज्या दिवशी नाना गेले, त्याच दिवशी मी ठरवले की, —----------
( संगीत बंद / वाद्य बंद / पेटी बंद / टाळ बंद )
ii) सखु आजी शिकली, सवरली असती—--------- जन्मली असती तर कुठल्या कुठे पोहोचली असती.
( खेड्यात / गावात / शहरात / परदेशात )
iii) एडिसनने—---------- उपयोग करून पाहिला.
( सोन्याचा / प्लॅटिनम चा / टंगस्टनचा / चांदीचा )
iv) —----------- सुमारे ७० ते ८० हजार प्रेक्षक बसण्याची सोय असते.
( मैदानात / तलावाजवळ / खोल्यांमध्ये / प्रेक्षागारात )

**क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.( कोणतेही १ )** गुण ३

i) मनुष्याच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासात क्रीडेचे महत्व अनन्यसाधारण असते. यावर तुमचे मत स्पष्ट करा.

ii) तुम्हाला समजलेल्या सखु आजीचे व्यक्तिचित्र रेखाटा.

iii) तुमच्या मते रेल्वे प्रवासाचे असलेले फायदे व तोटे सविस्तर लिहा.

**पद्य**

**प्रश्न ६ अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही ३ )** गुण ३

i) वारकरी संप्रदायरूपी इमारत उभे करणाऱ्या संतांची नावे लिहा .

ii) संत तुकाराम महाराज कोणाची वाट पाहत आहे ?

iii) व्यायामाचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा.

iv) वारकरी संप्रदायाचा पाया कोणी रचला ?

**ब) रिकाम्या जागा भरा.** गुण ३

i) व्यायाम हा आपल्याला सुखाचे आयुष्य देणारा—------ मित्र आहे.

( आरोग्यदायी / फलदायी / गुणकारी )

ii) आस लागणे म्हणजे —--------

( ध्यास लागणे / घाई होणे / तहान लागणे )

iii) पाहे —----------- वाट तुझी.

( दिवस रात्र / रात्रंदिवस / दुपारी )

**क) संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा. ( कोणतेही १)** गुण ३

i) " व्यायाम अंगी वाढे स्फूर्ती । कार्य करण्याची ॥

ii) दिवाळीच्या मुळा लेकी आसावली । पहात असे वाटूली पंढरीची ॥

**स्थूलवाचन**

**ड) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही २)** गुण २

i) काझीरंगा अभयारण्याची दोन भौगोलिक वैशिष्ट्ये लिहा .

ii) एक शिंगी गेंडा- माहिती लिहा.

iii) " वैजयंती " वैशिष्ट्ये लिहा.

प्रश्न ७.अ) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २००-२५० शब्दात निबंध लिहा . गुण ८

***निसर्ग माझा सोबती**

* स्वातंत्र्य सैनिकाचे मनोगत

( पारतंत्र्यातील जगणे -आज सर्वांना स्वातंत्र्य - स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्यांची कदर नसणे -असंख्य यातनामय प्रसंग - बलिदान व्यर्थ - स्वातंत्र्य टिकवण्याची गरज -त्याग केलेल्या स्वातंत्र्य वीरांचे स्मरण

**किंवा**

*** आई संपावर गेली तर**

( हा विचार मनात केव्हा व कसा आला - घरात उडणारा गोंधळ - शाळेला उशीर - अपूर्ण गृहपाठ -अभ्यासाकडे दुर्लक्ष -शाळेतून आल्यावर सगळीकडे पसारा - भूक लागणे - आईचे महत्त्व - आई संपावर न जाणे चांगले )

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा . कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा . गुण ७**

*वयोवृद्ध शेतकरी - शेताच्या कडेला आंब्याची झाडे लावणे -नगराच्या राज्याचे आगमन -विश्रांती घेणे व गप्पा मारणे - झाडे का लावता विचारणे -फळे कधी येणार -तुम्हाला काय उपयोग - शेतकरी -मी आज ज्या झाडांची फळे खातो --- माझ्या आजोबांनी लावली होती --राजाला आनंद --- बक्षीस - तात्पर्य

**<u>किंवा</u>**

*एक शेतकरी - वृद्ध होणे- चार मुले - आपापसात सतत भांडणे -बापाला चिंता - चौघांना एकत्र बोलावणे - एक एक काठी मोडण्यास सांगणे --काठी सहज मोडणे - खूप सार्या काठ्या एकत्र मोडण्यास सांगणे - प्रयत्न असफल होणे - एकीचे बळ -ताकद समजणे -बोध होणे -तात्पर्य

**<u>क) खालील विषयावर पत्र लिहा. ( लिफाफा आवश्यक )</u>** **गुण ५**

* तुमच्या मित्राला शाळेत निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला आहे ,त्यासाठी त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा

**किंवा**

* स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असणारी पुस्तके मिळण्यासाठी " यशस्वी पुस्तकालय " या पुस्तकालयाकडे पुस्तकांची मागणी करणारे पत्र विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने लिहा